सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
राज्य आरोग्य सोसायटी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कार्यालय

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

आरोग्य भवन, ३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२-२२७१ ७५०० | ईमेल : mdnrhm.mumbai@gmail.com | www.nrhm.maharashtra.gov.in

क्र. आसेंआ/खरेदीकक्ष/Inj. Amphotericin B /2021
दिनांक :- १७.०५.२०२१

प्रति,

१) जिल्हाधिकारी (सर्व)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

३) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)

४) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

विषय - **खाजगी रुग्णालयांमध्ये दाखल Mucormycrosis च्या रुग्णांना Inj. Amphotericin B उपलब्ध करुन देणेबाबत.**

राज्यामध्ये Mucormycrosis या आजाराचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळुन येत आहेत. या रुग्णांच्या उपचारासाठी Inj.Amphotericin B आवश्यक आहे. सध्या या औषधाचा तुटवडा आहे. आरोग्य विभागामार्फत सध्या Inj. Amphotericin B या औषधाची खरेदी करुन सर्व जिल्हयांना पुरवठा करण्यात येत आहे. तथापि खाजगी मेडिकल स्टोअर मध्ये औषधे उपलब्ध नसल्यामुळे खाजगी रुग्णालयात दाखल रुग्णांनाही ही औषधे पुरविण्यात यावीत अशी विनंती ब-याच जिल्हयांकडुन होत आहे. त्या संदर्भाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) जिल्हयातील खाजगी वितरकांकडे उपलब्ध Inj. Amphotericin B चे आवश्यतेनुसार Mucormycrosis च्या रुग्णांच्या प्रमाणात वाटप जिल्हयाधिकारी यांच्या सल्ल्याने करण्यात यावी .

२) Mucormycrosis उपचार करणा-या खाजगी रुग्णालयांनाच Inj. Amphotericin B उपलब्ध करुन दयावे.

३) रुग्णांना संपुर्ण डोससाठी लागणारी औषधी एकाच वेळी रुग्णांना/रुग्णालयात देवु नये. प्रत्येक वेळी एक किंवा दोन दिवसाची मात्रा रुग्णालयास उपलब्ध करुन दयावी.

४) शासकीय रुग्णालयात पुरेसा साठा असेल तरच खाजगी रुग्णालयांना देण्यात यावा.

५) साठा उपलब्ध करुन दिल्यास औषधाच्या किंमतीएवढी रक्कम खाजगी रुग्णालयाकडुन जिल्हा आरोग्य सोसायटीच्या कोविड-१९ खात्यामध्ये जमा करुन घ्यावी व त्यानंतरच औषधाचे वितरण करावे.

उपरोक्त सुचनांनुसार कार्यवाही करावी.

17.05.2021.

**आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**
**मुंबई**

प्रत सादर : अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रतिलिपी समादराने - आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, मुंबई.

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ : एमएससीडीए/८१/२०२१ दि.१७.०५.२०२१

**सर्व मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी**
**सर्व झोन कार्यकारिणी पदाधिकारी / अध्यक्ष / सचिव जिल्हा संघटना**
**महाराष्ट्र राज्य केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन**

**विषय : खाजगी रुग्णालयांमध्ये दाखल Mucormycrosis च्या रुग्णांना Inj.Amphotericin B उपलब्ध करुन देणेबाबत**

महोदय,

वरील विषयास अनुसरुन राज्य संघटनेस आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र शासन यांच्या कार्यालयातुन प्राप्त झालेल्या पत्राची प्रत यापत्रासोबत आपल्या माहितीस्तव जोडत आहोत.

आपल्या जिल्ह्यातील जे सभासद **Inj.Amphotericin B** च्या व्यवसायामध्ये सलंग्न असतील त्यांना ही माहिती कळविण्यात यावी.

सदरहू पत्र आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

कळावे.

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
**सचिव**